# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/2964/2023-24 दि.05/03/2024

प्रति,
सिस्टिम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर व ITS ऑफिसर (परिवहन) या पदाची जाहीर सूचना प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ :- 1) मा.आयुक्त महोदय यांची दि.04/03/2024 रोजीची मंजूरी.
2) जा.क्र.मनपा/आस्था/2964/2023-24, दि.05/03/2024 रोजीची जाहीर सूचना.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या परिवहन उपक्रमाकरीता 06 महिन्यांसाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर व ITS ऑफिसर (परिवहन) या या पदाकरीता जाहीर सूचना प्रसिध्द करणेकरीता मा. आयुक्त महोदय यांनी दि.04/03/2024 रोजी मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार परिवहन उपक्रमाकरीता ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर व ITS ऑफिसर (परिवहन) या पदाची जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहिर सूचनेची छायांकित प्रत

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/2964/2023-24 दि.05/03/2024

**परिवहन उपक्रमासाठी ठोक मानधनावर ऑपरेशन मॅनेजर (बस ऑपरेशन), डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व ITS ऑफिसर (परिवहन) नियुक्त करणेबाबत.**

## // जाहीर सूचना //

मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या परिवहन उपक्रमाकरीता 06 महिन्यासाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर (बस ऑपरेशन), व ITS ऑफिसर (परिवहन) या जागा थेट मुलाखतीद्वारे **(Walk In Selection)** भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटी शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीसह मा. स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) जि. ठाणे - 401101 येथे दि.13/03/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

सदर जाहिर सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

➢ पदसंख्या, वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1. | डेपो मॅनेजर (ठोक मासिक मानधन रु.50,000/- सर्व भत्त्यासह) | 01 | किमान 40 वर्षे ते कमाल 65 वर्षापर्यंत | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/ऑटोमोबाईल अथवा तत्सम समकक्ष अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका उत्तीर्ण.<br>2. परिवहन उपक्रमामध्ये जड वाहनांच्या मेंटनन्स संबंधी डेपो मॅनेजर/ऑपरेशन मॅनेजर/मेंटनन्स मॅनेजर वा तत्सम कामाचा किमान 15 वर्षाचा अनुभव.<br>3. मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| 2. | ऑपरेशन मॅनेजर (बस ऑपरेशन) ठोक मानधनावर (मासिक वेतन रु.50,000/- सर्व भत्त्यासह) | 01 | किमान 40 वर्षे ते कमाल 65 वर्षापर्यंत | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>2. परिवहन उपक्रमामध्ये किमान 100 बसचा ताफा असलेल्या उपक्रमामध्ये डेपो मॅनेजर/ऑपरेशन मॅनेजर/डेपो सुपरीटेंडन्ट म्हणून वा तत्सम कामाचा किमान 15 वर्षाचा अनुभव.<br>3. मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| 3. | ITS ऑफिसर (ITS मॅनेजर) ठोक मानधनावर (मासिक वेतन रु.45,000/- सर्व भत्त्यासह) | 01 | किमान 18 वर्षे ते कमाल 40 वर्षे | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाची इलेक्ट्रॉनिक्स/कॉम्प्युटर/इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अथवा तत्सम समकक्ष अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण.<br>2. पदवी प्राप्त केल्यानंतर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी/ कॉम्प्युटर संबधित कामाचा किमान 03 वर्षाचा अनुभव असावा.<br>3. मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |

<u>अटी व शर्ती-</u>

1. उमेदवारांची वयोमर्यादा जाहिर सुचनेच्या दिनांकापासून धरण्यात येईल.
2. उमेदवारांना 06 महिन्यांकरीता ठोक मानधनावर नियुक्ती देण्यात येईल.
3. अ.क्र.1 ते 3 मधील पदांसाठी गुणांकनाची पध्दत 100 गुणांची असेल.

- अ.क्र.1 व 02 मधील पदांसाठी शैक्षणिक अर्हतेसाठी 60 पैकी गुण, अनुभवासाठी 20 पैकी गुण व सामान्य ज्ञान 20 पैकी गुण असे गुण आधारीत असतील. अनुभवासाठी प्रत्येक वर्षास एक गुण याप्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण देण्यात येतील.
- अ.क्र.3 मधील पदासाठी शैक्षणिक अर्हतेसाठी 70 पैकी गुण, अनुभवासाठी 10 पैकी गुण व सामान्य ज्ञान 20 पैकी गुण असे गुण आधारीत असतील. अनुभवासाठी प्रत्येक वर्षास एक गुण याप्रमाणे जास्तीत जास्त 10 गुण देण्यात येतील.

टिप :- उपरोक्त गुणांकनाच्या पध्दतीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष निवड समिती यांनी राखून ठेवला आहे.

4. निवड व प्रतिक्षा यादी गुणानुक्रमे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच प्रतिक्षा यादीची विधीग्राह्यता 06 महिन्याची राहील.
5. नियुक्तीच्या कालावधीमध्ये सोपविलेले परिवहन विभागातील कामे पुर्ण करुन सादर करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमी पत्र/बंध पत्र घेण्यात येईल.
6. ठोक मानधनावर नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात /मनपामध्ये सेवा समावेशनाबाबत/सामावुन घेण्याबाबतचा अधिकार/ हक्क नसेल.
7. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या ठोक मानधनावरील उमेदवारांवर मा.न्यायालयात फौजदारी गुन्हा दावा दाखल झालेला नसावा. गुन्हा नोंद असल्याचे दिसून आल्यास सदर उमेदवारास कोणतीही पूर्वसुचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.
8. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परीस्थितीत कोणत्याही वेळी अशा ठोक मानधनावरील उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
9. आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे ठोक मानधनावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.
10. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रीया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.
11. इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीमधील नमुद केलेली शैक्षणिक पात्रता/अर्हता तसेच अनुभव प्रमाणपत्र मुळ प्रती व दोन छायांकित प्रतीचे संचासह उपस्थित राहावे.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- .................................... पदांचा सांकेतिक क्र. .................................... )

प्रति,

मा.आयुक्त सो.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)

ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | संपुर्ण नांव | : | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
| १. | आडनांव | : | ........................................ | ........................................ |
| २. | स्वतःचे नांव | : | ........................................ | ........................................ |
| ३. | वडिलांचे/ पतीचे नांव | : | ........................................ | ........................................ |

(२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ........................................................................................

(पिन कोडसहित) ........................................................................................

........................................................................................

........................................................................................

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक : ........................................................................................

**ई-मेल आयडी** : ........................................................................................

(३) अ) जन्मतारीख : तारीख महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) दिनांक ०५/०३/२०२४ रोजीचे वय

..........................वर्ष..........................महिने............दिवस

(४) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

(५) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ? : होय/नाही

(६) शैक्षणिक अर्हता:

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

(७) अनुभव:

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(८) अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

(९) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

(१०) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) ............................ २) ........................................ ३) ........................................

४) ............................ ५) ........................................ ६) ........................................

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

अर्जदाराची सही/-

दिनांक :-